
**भाजपसोबत युती नको, मूळ ओबीसींना प्राधान्य द्या** >> पान 2

**राहुल गांधींचा आरोप; हरियाणाप्रमाणेच महाराष्ट्र, मध्य प्रदेशातही मतचोरी, आमच्याकडचे पुरावे** >> पान 3

**महाराष्ट्र हे भारताचे खरे ‘स्टार्टअप कॅपिटल’** >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



अभिनेता वरुण धवनने आपल्या सोशल मीडियावर शेअर केला हुक्कीचा फर्स्ट लुक

आतील पान

**सुविचार**

सकारात्मक विचारांमुळे जीवन आनंदी होते.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 97 ■ सोमवार, दि. 10 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत
# प्रविण दरेकरांची बाजी

**सर्वच २९ जागांवर विजय**



**मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदी भाजपचे नेते आणि आमदार प्रवीण दरेकर हे बहुमतांनी विजयी झाले आहेत. जय कवळी आणि प्रवीण दरेकर यांच्या पॅनेलचे २९ पैकी २९ म्हणजे सर्वच उमेदवार विजयी झाले आहेत. महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदासाठी आज निवडणूक प्रक्रिया पार पडली. यामध्ये प्रविण दरेकरांनी बाजी मारल्याचं पाहायला मिळालं.**

महाराष्ट्र बॉक्सिंग संघटनेची वार्षिक निवडणूक रविवार दिनांक ९ नोव्हेंबर २०२५ रोजी धर्मादाय आयुक्त कार्यालय, वरळी, मुंबई येथे पार पडली. सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत मतदानाची वेळ निश्चित करण्यात आली होती. ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया धर्मादाय आयुक्त तथा निवडणूक अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली झाली आहे. या निवडणुकीत अध्यक्ष, १६ उपाध्यक्ष, महासचिव, खजिनदार, कार्यकारी सचिव, व्यवस्थापकीय सदस्य आणि विभागीय सचिव या महत्त्वाच्या पदांसाठी निवड प्रक्रिया झाली आहे. दरम्यान, खजिनदार पदासाठी नाशिकचे ड मनोज पिंगळे हे बिनविरोध निवडून आले आहेत. विभागीय सचिव या पदासाठी एकूण आठ जागा असून त्यापैकी सहा उमेदवार बिनविरोध विजयी ठरले आहेत. त्यात नाशिकचे मयूर बोरसे, कोल्हापूरचे मंगेश कराळे, लातूरचे ड संपत साळुंखे, छत्रपती संभाजीनगरचे अरुण भोसले, पुण्याचे विजयकुमार यादव आणि अमरावतीचे विजय गोटे यांचा समावेश आहे.

अध्यक्षपदासाठी प्रवीण दरेकर आणि रणजीत सावरकर यांच्यात थेट लढत होती

निवडणुकीकडे राज्याच्या क्रीडा क्षेत्राचे लक्ष लागलेले होते. >> पान ४

## थोरल्याच्या प्रतापाने धाकट्यावर अन्याय?

**पार्थ पवार प्रकरणामुळे जय पवारांची बारामती नगराध्यक्ष पदाची संधी हुकली?**



**पुणे/प्रतिनिधी :** पार्थ पवार यांचे जमीन प्रकरण वादाच्या भोवऱ्यात सापडल्याने जय पवारांची नगराध्यक्ष पदाची उमेदवारी हुकली का असा प्रश्न पडला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जय पवार हे बारामती नगराध्यक्ष पदाचे उमेदवार नसणार हे आज स्पष्ट केले. मात्र तरी देखील जय पवारांच्या उमेदवारीला काट कोणामुळे मिळाली असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

बारामती नगराध्यक्ष पदासाठी जय पवार उमेदवार असतील अशी चर्चा मागच्या आठवड्यात होती. मात्र पार्थ पवारांचे प्रकरण पुढं आलं आणि जय पवारांची संधी हुकली का असा सवाल विचारला जातोय.

जय पवार उपमुख्यमंत्री अजित पवारांचे धाकटे चिरंजीव, परंतु थोरल्याच्या प्रतापामुळे धाकट्यावरती अन्याय झालाय का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पार्थ पवारांचं जमीन प्रकरण >> पान ४

## देशभरात दहशतवादी हल्ल्यांची योजना

दैनिक आपला विदर्भ

अहमदाबाद : देशभरात दहशतवादी हल्ल्यांची योजना आखण्याचा कट रचल्याच्या आरोपाखाली गुजरात दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) रविवारी अहमदाबादमधून तीन संशयितांना शस्त्रे पुरवताना अटक केली. गुजरात एटीएसच्या म्हणण्यानुसार, तिन्ही संशयित गेल्या वर्षभरापासून त्यांच्या रडारवर होते. ''गुजरात एटीएसने तीन संशयितांना अटक केली आहे. ते गेल्या वर्षभरापासून गुजरात एटीएसच्या रडारवर होते. शस्त्रास्त्रे पुरवताना तिघांनाही अटक करण्यात आली. ते देशाच्या विविध भागात दहशतवादी हल्ले करण्याची योजना आखत होते,'' असे गुजरात एटीएसने एका निवेदनात म्हटले आहे. या वर्षाच्या सुरुवातीला गुजरात एटीएसने अल-कायदा इन द इंडियन सबकॉन्टिनेंट (अँेएए) च्या पाच दहशतवाद्यांना अटक केली होती. यात बंगळुरूमधील एका महिलेचा समावेश होता. ही महिला कथितपणे ऑनलाइन दहशतवादी मॉड्यूल चालवत होती आणि तिचे पाकिस्तानी संपर्काशी संबंध होते. अल कायदा या दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याच्या आरोपाखाली एटीएसने बंगळुरू येथून सम परवीन या ३० वर्षीय महिलेला अटक केली होती.

## ‘मातोश्री’वर ड्रोनच्या घिरट्या, उद्धव ठाकरेंची सुरक्षा धोक्यात?



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे निवास स्थान असलेल्या मातोश्रीवर ड्रोन द्वारे नजर ठेवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या ड्रोनचा व्हिडीओ समोर आल्यानंतर खळबळ उडाली आहे. मातोश्री हे निवासस्थान सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील समजले जाते. मात्र, ड्रोनच्या माध्यमातून नजर ठेवल्याच्या आरोप होत असून आता यावरुन राजकारणही तापण्याची चिन्हे आहेत. तर, दुसरीकडे मुंबई पोलिसांनी या प्रकरणी स्पष्टीकरण दिले आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, वांद्रे येथील मातोश्री परिसरात एक अज्ञात ड्रोन घिरट्या घालताना आढळला. या परिसरात कोणत्याही प्रकारचे ड्रोन किंवा हवाई साधन उडवण्यास कायद्याने बंदी आहे. मुंबईतील अनेक ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने ड्रोन उडवण्यास मनाई आहे. अशातच आता मातोश्रीवर ड्रोनने नजर ठेवल्याची घटना समोर आल्याने खळबळ उडाली आहे. ठाकरेंच्या सुरक्षेच्या दृष्टीने 'मातोश्री' हा उच्च सुरक्षा झोन असल्याने हा प्रकार गांभीर्याने घेतला जात आहे. पोलिसांनादेखील याबाबत कळवण्यात आले आहे.

## मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणी मोठा ट्वीस्ट

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील कोरेगाव पार्क येथील बहुचर्चित आणि वादग्रस्त जमीन गैरव्यवहार प्रकरणात उपमुख्यमंत्री अजित पवार पुत्र पार्थ पवार चांगलेच अडचणीत सापडले आहेत. पार्थ पवार यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी होत असताना दुसरीकडे विरोधकांकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांची कोंडी करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. या जमीन गैरव्यवहार प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. या प्रकरणातील निलंबित तहसीलदार सुर्यकांत येवले यांचे पत्र समोर आले आहे.

चर्चेत असलेल्या मुंढवा जमीन घोटाळ्यात निलंबित तहसीलदार सूर्यकांत येवले यांचा थेट सहभाग असल्याचे नवे तपशील समोर आले आहेत. येवले यांनी या वादग्रस्त जमिनीबाबत सरकारी संस्थांना अधिकृत पत्रे पाठवून ती जमीन 'मुळ वतनदारांना परत देण्याचा' उल्लेख केला होता. मात्र, हीच जमीन नंतर पार्थ पवार यांच्या 'अमेडीया' कंपनीकडे देण्याचा मार्ग मोकळा करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात येत आहे.

तहसीलदार सुर्यकांत येवले यांनी बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडियाला पत्र लिहिले होते. मुंढवा मधील जागा महार वतनदारां.ची आहे आणि ते भोगवटा भरण्यास तयार असल्याने त्यांना ती जागा परत देण्यात येत आहे असे पत्रात नमूद करण्यात आले होते. या जमिनीच्या व्यवहारासाठी येवले यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू असल्याचे दिसून आले आहे. काही महिन्यांपासून त्यांचा पत्र व्यवहार सुरू होता, अशी माहिती समोर आली आहे.

कधी-कधी झाला पत्र व्यवहार?

निलंबित तहसीलदार सुर्यकांत येवले याने सर्वात आधी ही जागा महार वतनदांरा.ची आहे आणि ते भोगवटा भरण्यास तयार असल्याने त्यांना ती जागा परत देण्यात येत आहे असे पत्र जून महिन्यात बॉटिनीकल सर्वे ऑफ इंडिया या स.ंस्थेला दिले. ही जागा तात्काळ रिकामी करण्यासही सांगितले. त्यानंतर येवले यांनी जुलै महिन्यात उपविभागीय अधिकारी कार्यालयाला दुसरे पत्र लिहीले आणि ही जागा मुळ वतदनदारांना परत देण्याची प्रक्रिया सुरू करण्यास सांगितले.

वतनदारांची पॉवर ऑफ एटर्नी शीतल तेजवानीकडे होती. या शीतल तेजवानीने ही जागा ३०० कोटींना अमेडीया कंपनीला विकली असल्याने ही जागा अमेडीया कंपनीला देण्याचे आदेश देण्यात आले.

आता हे पत्र समोर आल्याने तहसीलदार येवलेला हाताशी धरून ही जमीन बळकावण्याचे प्रयत्न अनेक महिन्यांपासुन सुरु होता का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि मोहन भागवत यांची
# किंमत रबर स्टॅम्प पेक्षाही कमी

**काँग्रेसच्या हर्षवर्धन सपकाळ यांची घणाघाती टीका**

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :**मोहन भागवतांनी ठरवून घ्यावं कि त्यांना नेमकं काय हवं आहे. शंभर वर्ष झाल्यानंतर त्यांनी ठरवून घ्यावं की त्यांची संघटनेची नेमकी उद्दिष्टे काय आहेत. ते नेहमी संभ्रमात असल्याचे आढळून येतात. अलीकडच्या काळात त्यांचा कुठलाही प्रभाव भाजप आणि महाराष्ट्राच्या राजकारणावर राहिलेला नाही. कारण पंतप्रधान मोदी हे त्यांचं ऐकायला तयार नाहीत.

७५ वर्षाचा रिटायरमेंट घेण्याचं ते ऐकायला तयार नाहीत. देवेंद्र फडणवीस यांनाही त्यांनी सांगितलं होतं की अजित पवारांना सोबत घेऊ नका, तरी त्यांनी सोबत घेतलं. त्यामुळे रबर स्टॅम्प पेक्षाही कमी किंमत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि मोहन भागवतांची झालेली दिसून येते. अशी घणाघाती टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. ते बुलढाणा येथे बोलत होते.

राज्यात महविकास आघाडी युती संदर्भात राज्यस्तरावर कुठेही युती आघाडीची घोषणा नाही. मात्र सर्व अधिकार स्थानिक नेतृत्वाला दिलेले आहेत. त्यामुळे १२ तारखेला सर्व निर्णय होतील. >> पान ४

**वा रं पठ्ठ्या आई-वडलांचं नाव काढलंस!**

# पुत्रं असावा ऐसा ज्याचा तिन्ही लोकी झेंडा- नामदार चंद्रकांतदादा पाटील

➤ सुवर्णपदक विजेत्या सनी फुलमाळीचे ना. चंद्रकातदादा पाटील यांच्याकडून पालकत्व

➤ लोकसहभागातून घर आणि शिक्षणासह स्वतःच्या पगारातून दरमहा ५० हजार देण्याची घोषणा







घरची परिस्थिती बिकट असूनही जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या बळावर बहरिन येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये भारतासाठी सुवर्णपदक कमावणाऱ्या सनी फुलमाळेचं आयुष्यच पालटलं आहे. लोहगाव मधील पालावर राहून कुस्तीमध्ये सुवर्ण कामगिरी करणाऱ्या सनी फुलमाळीचे पालकत्व राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील यांनी घेतले आहे. लोकसहभागातून घर आणि सरावासाठी तालीम, शिक्षणासाठी सर्वतोपरी मदत आणि स्वतःच्या पगारातून दरमहा ५० हजार देण्याची घोषणा ना. पाटील यांनी केली.

ना. पाटील यांनी सुवर्ण पदक विजेत्या सनी फुलमाळी आणि त्याच्या कुटुंबाची लोहगाव मधील पालावर जाऊन भेट घेत अभिनंदन करुन त्याच्या कामगिरीचे भरभरून कौतुक केलं. यावेळी सनीचे प्रशिक्षक वस्ताद सदाशिव राखपसरे, भाजपा क्रीडा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष संदीपआप्पा भोंडवे, माजी नगरसेवक बॉबी टिंगरे यांच्यासह भागातील नागरिक आणि पालावरील बांधव उपस्थित होते.

सनीच्या कामगिरीचे कौतुक करताना ना. चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनतीच्या बळावर सनीने मिळवलेले यश हे अतिशय कौतुकास्पद आहे. आज त्याने आपल्या कामगिरीने आई-वडिलांचं नाव काढलं आहे. डोक्यावर छप्पर नसतानाही पालावर राहून त्याने ही कामगिरी केली आहे.

ते पुढे म्हणाले की, सनीला लोकसहभागातून घर आणि कुस्तीच्या सर्वांसाठी तालीम बांधून देणार आहे. त्यासोबतच शिक्षणासाठी ही सर्वतोपरी मदत करणार असून, माझ्या आणि पत्नीच्या उत्पन्नातून उदरनिर्वाहासाठी दरमहा ५० हजार रुपये देणार असल्याची घोषणा ना. पाटील यांनी यावेळी केली. तसेच, त्याने आपले शिक्षण पूर्ण करण्यासोबतच कुस्तीकडे लक्ष केंद्रित करावे. आणि ऑलिम्पिक मध्येही सुवर्ण कामगिरी करावी, अशी इच्छा व्यक्त केली.

## १७ वर्षाखालील खेळाडूंनाही शासकीय नोकरीसाठी पाठपुरावा करणार- ना. चंद्रकांतदादा पाटील

आंतरराष्ट्रीय तथा राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करुन पदक मिळवणाऱ्या खेळाडूंना शासकीय सेवेत सामावून घेण्याचा मा. देवेंद्र फडणवीस यांच्या काळात यापूर्वीच निर्णय झालेला असून, राज्यभरातील असंख्य खेळाडुंना त्याचा लाभ झालेला आहे. मात्र सदर निर्णय हा १७ वर्षांवरील खेळाडूंना लागू आहे. त्यामुळे सनीच्या निमित्ताने १७ वर्षा खालील खेळाडुंनाही प्रोत्साहन मिळावे, यासाठी मा. मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार असल्याचे ही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.



## बांगलादेशची नवी कुरापत

बांगलादेश हा भारताचा सख्खा शेजारी देश. एकेकाळी भारतातच असलेला आणि भारतामुळेच पाकिस्तानच्या जोखडातून मुक्त झालेला देश. १९७१ साली भारतानेच पाकिस्तानला युद्धात पराभूत करून बांगलादेशची निर्मिती केली. बांगलादेशची निर्मिती झाल्यापासून भारताचे बांगलादेशशी कायम मित्रत्वाचे संबंध होते. बांगलादेश भारताचा शेजारी असला तरी भारताने त्याला कायम छोट्या भावा सारखीच वागणूक दिली आहे. बांगलादेशवर ज्या ज्या वेळी संकटे आली त्या त्या वेळी भारतच धावून गेला त्यामुळे गेल्या अनेक पाच दशकांपासून भारत आणि बांगलादेशचे संबंध मैत्रीपूर्ण आणि सौहार्दाचे राहिले आहेत मात्र या संबंधांना मागील काही वर्षात तडा गेला आहे. भारत बांगलादेश संबंधातील सौहार्दात कटुता निर्माण होऊन दोन्ही देशात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. हा तणाव कमी करून दोन्ही देशात पूर्वी प्रमाणे मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न भारताकडून होत असताना बांगलादेश मात्र काही तरी कुरापती काढून दोन्ही देशातील तणाव कायम ठेवत आहे. विशेषतः मोहम्मद युनूस हे बांगलादेश सरकारचचे हंगामी प्रमुख झाल्यापासून या तणावात खूप भर पडली आहे. मोहम्मद युनूस हे सतत काहीतरी कुरापत काढून दोन्ही देशातील तणावात भर घालत आहे. आताही त्यांनी अशीच एक कुरापत काढून भारताला चिथावणी देण्याचा प्रयत्न केला आहे. बांगलादेशच्या हंगामी सरकारचे प्रमुख असलेल्या मोहम्मद युनूस यांना ग्रेटर बांगलादेशची स्वप्ने पडू लागली आहेत  कदाचित त्यामुळेच त्यांनी भारताच्या ईशान्येकडील राज्याचा समावेश करून बांगलादेशचा नवा नकाशा प्रदर्शित केला इतकेच नव्हे तर भारताला चिथवण्यासाठी त्यांनी हा नकाशा भारताचा  शत्रू असलेल्या पाकिस्तानच्या संरक्षणदल प्रमुखांना आणि ऑपरेशन सिन्दुर मध्ये पाकिस्तानला साथ देणाऱ्या तुर्कीच्या संरक्षणदल प्रमुखांना भेट दिला. भारताचा भूभाग असलेला प्रदेश आपल्या नकाशात दाखवून तो नकाशा भारताच्या शत्रू राष्ट्रांना भेट देणे ही कृती भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणारीच आहे म्हणूनच भारताने मोहम्मद युनूस यांच्या या कृतीची गंभीर दखल घेऊन बांगलादेशला जशास तसे उत्तर द्यायला हवे. भारताने तशी याची दखल घेतलीच आहे. भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी याची दखल घेऊन मोहम्मद युनूस यांना नेमक्या शब्दात समज दिली आहे. भारताला बांगलादेश बरोबर तणाव वाढवण्याची इच्छा नाही मात्र आपण काय करत आहोत याचा नीट विचार मोहम्मद युनूस यांनी करावा असे राजनाथ सिंग यांनी बजावले आहे. त्याचवेळी बांगलादेशने भारताला आव्हान मिळाले तर त्याला मुखभंग करणारे प्रत्युत्तर देण्यास भारत कचरणार नाही असा इशाराही त्यांनी बांगलादेशला दिला आहे. मोहम्मद युनूस सातत्याने भारताच्या कुरापती काढून भारताला चिथावत आहेत भारत मात्र संयमाने परिस्थिती हाताळत आहे कदाचित त्यामुळेच मोहम्मद युनूस यांची मजल वाढत चालली आहे. मोहम्मद युनूस गेल्या काही महिन्यांपासून चीन, पाकिस्तान आणि तुर्की या देशांच्या साहाय्याने भारताला आव्हान देण्याची तयारी करत आहेत. विशेषतः ईशान्येकडील राज्यांना भारताच्या उर्वरित भूभागागी जोडणाऱ्या सिलीगुडी कॉरिडॉर किंवा चिकन नेकची कोंडी करण्याची भाषा मोहम्मद युनूस बोलत आहेत. पाकिस्तानच्या लष्करी अधिकाऱ्यांना बांगलादेशच्या सीमेतून या भूभागाची पाहणी करण्याची संधी देखील युनूस यांच्या सरकारने दिली होती. याबरोबरच चिकन नेक जवळील बांगलादेशचा हवाई तळ चीनकडे सोपवण्याची तयारीही बांगलादेशने केली आहे. भविष्यात जर भारताशी संघर्ष वाढलाच तर चीन, पाकिस्तान आणि तुर्की हे देश आपल्या पाठीशी उभी राहतील असा विश्वास त्यांना वाटतो म्हणूनच ते या देशांना कुरवाळत आहेत. यातच सध्या भारत आणि अमेरिकेचे संबंध बिघडले आहेत त्याचा फायदा घेऊन अमेरिकेला खुश करण्याची तयारीही मोहम्मद युनूस यांनी केली आहे त्यासाठी ते बांगलादेशचे सेट मार्टिन बेट अमेरिकेच्या हवाली करण्याच्या तयारीत आहेत. या सर्व बाबींचा विचार करता हा सर्व प्रकार भारताला चिथावणी देणारेच आहे. अर्थात इतके सर्व घडत असूनही भारताने संयमाची भूमिका सोडली नाही कदाचित त्यामुळेच मोहम्मद युनूस यांची मजल वाढत चालली आहे ते भारताच्या संयमाला भारताची कमजोरी समजू लागले आहेत पण भारताचा संयम ही भारताची कमजोरी नाही.  भारताचा संयम संपला तर बांगलादेशचे नाव जगाच्या नकाशातून गायब होऊ शकते याचेही भान मोहम्मद युनूस यांनी ठेवावे. जो भारत बांगलादेशची निर्मिती करू शकतो तोच भारत बांगलादेशला संपवूही शकतो हे मोहम्मद युनूस यांच्या जितक्या लवकर लक्षात येईल तितके त्याचे आणि त्यांच्या  देशासाठी भल्याचे ठरेल.

# भाजपसोबत युती नको, मूळ ओबीसींना प्राधान्य द्या

## शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीची इनसाईड स्टोरी

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे बैठक पार पडली. या बैठकीत शरद पवार यांनी आगामी स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. शरद पवार यांनी बैठकीत पक्षानं भाजप सोबत युती करु नये अशा सूचना दिल्याची माहिती एबीपी माझाला खात्रीलायक सूत्रांकडून मिळाली आहे.

याशिवाय स्थानिक स्वराज सफंस्था निवडणुकीत मूळ ओबीसींना उमेदवारी द्यावी, जर मूळ ओबीसी प्रमाणपत्रधारक उमेदवार मिळाला नाही तर कुणबी प्रमाणपत्र धारक उमेदवाराचा विचार करावा अशा सूचना दिल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांकडून मिळत आहे.

कोणत्याही परिस्थितीत भाजपसोब युती नको : शरद पवार

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची वाय बी चव्हाण सेंटर येथे बैठक पार पडली. या बैठकीला पक्षाचे खासदार, आमदार उपस्थित होते. शरद पवारांनी कोणत्याही परिस्थितीत भाजपसोबत जायचं नाही अशा सूचना शरद पवार यांनी दिल्या आहेत. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस सोबत आघाडी करण्याचा मार्ग या निमित्तानं मोकळा झाला आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मूळ ओबीसी उमेदवार असतील त्यांना प्राधान्य द्यावं. मूळ ओबीसी प्रमाणपत्र धारक उमेदवार मिळत नसेल तर त्या ठिकाणी कुणबी प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना उमेदवारी द्यावी,अशा प्रकारच्या सूचना शरद पवार यांनी दिली आहे.  ज्या ठिकाणी ओबीसी प्रवर्गाचं आरक्षण पडलं आहे, तिथं मूळ ओबीसींना उमेदवारी द्यावी. मूळ ओबीसींना कुठेही दुखवू नका अशा सूचना देण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला लोकसभा निवडणुकीत चांगलं यश मिळालं होतं. राष्ट्रवादीनं लोकसभेच्या १० जागा लढवल्या होत्या. त्यापैकी ८ जागांवर राष्ट्रवादी काँग्रेसनं विजय मिळवला होता. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत शरद पवारांच्या पक्षाला १० जागांवर विजय मिळाला होता. आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र



पवार पक्षाकडून आगामी स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीसाठी तयारी सुरु करण्यात आली आहे. आज मुंबईतील वाय बी चव्हाण सेंटर येथे पक्षाचे खासदार, आमदार आणि पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीतील इनसाईड स्टोरी समोर आली असून शरद पवारांचा पक्ष केवळ भाजपसोबत कुठेही युती करणार नाही.

दरम्यान, महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं देखील फक्त एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसोबत कुठेही युती होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या होत्या.

# प्राचार्य नागोराव कुंभार यांना जीवनगौरव पुरस्कार

**दैनिक आपला विदर्भ**

**सातारा/प्रतिनिधी :** वर्धा येथील यशवंतराव दाते स्मृती संस्थेच्यावतीने ज्येष्ठ विचारवंत डॉ. भा.ल.भोळे व डॉ. यशवंत सुमंत यांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी दीपक गायकवाड(पुणे), प्रा.वृषाली मगदूम (वाशी- मुंबई), डॉ. देवकुमार अहिरे (पुणे) यांची निवड करण्यात आली व जीवन गौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ संशोधक, विचारवंत प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार (लातूर) यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती निवड समितीचे प्रमुख निमंत्रक ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ व यशवंतराव दाते संस्थेचे अध्यक्ष प्रदीप दाते यांनी दिली. या पुरस्कार वितरण समारंभाची तारीख नंतर जाहीर करण्यात येणार  आहे.

डॉ. यशवंत सुमंत कुटुंबियांच्यावतीने सहा वर्षापासून ज्येष्ठ अभ्यासकासाठी जीवनगौरव पुरस्कार सुरु केला आहे. यावर्षीच्या सहाव्या पुरस्कारासाठी विचारशलाका त्रैमासिक व तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील कामगिरीसाठी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार (लातूर) यांची निवड करण्यात आली आहे.  यशवंतराव दाते स्मृती संस्था व डॉ. भा. ल. भोळे कुटुंबीय यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणार्या भोळे स्मृती वैचारिक साहित्य पुरस्कारासाठी दीपक गायकवाड  (पुणे) यांच्या 'पेरियार -मिथक आणि वास्तव' या ग्रंथाची निवड करण्यात आली आहे. भोळे कुटुंबीय व दाते संस्थेचे संयुक्त विद्यमाने देण्यात येणाऱ्या डॉ.भा.ल.भोळे स्मृती सामाजिक कार्यकर्ता पुरस्कारासाठी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, प्रा. वृषाली मगदूम (वाशी-मुंबई) यांची निवड करण्यात आली आहे. डॉ. यशवंत सुमंत स्मृती युवा संशोधन प्रेरणा पुरस्कारासाठी सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे इतिहास विभागातील प्राध्यापक, संशोधक डॉ. देवकुमार अहिरे (पुणे) यांची निवड करण्यात आली आहे .वरील पुरस्काराचे स्वरूप  डॉ.भा.ल. भोळे स्मृती पुरस्कार प्रत्येकी वीस हजार व डॉ.यशवंत सुमंत स्मृती पुरस्कार प्रत्येकी दहा हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल व मानपत्र असे आहे. पुरस्कार निवड समितीमध्ये प्रदीप दाते, डॉ. राजेंद्र मुंढे, प्रा. हाशम शेख (वर्धा), डॉ. अशोक चौसाळकर (कोल्हापूर ), डॉ.चैत्रा रेडकर, विजयाताई भोळे, हिरण्मय भोळे, माधुरी सुमंत (पुणे) व किशोर बेडकिहाळ (सातारा) आदी मान्यवरांनी काम केले अशी माहिती दाते स्मृती संस्थेचे संजय इंगळे तिगावकर व डॉ. राजेंद्र मुंढे यांनी दिली. माधुरी सुमंत, विजयाताई भोळे  व दाते स्मृती संस्थेचे अध्यक्ष प्रदीप दाते यांचे योगदानाद्वारे गेले अनेक वर्षांपासून हा उपक्रम महाराष्ट्रातील वैचारिक, साहित्यक सामाजिक  व सांस्कृतिक क्षेत्रात राबविण्यात येत आहे .


## सासुचा आगीत मृत्यू झाल्याचा सुनेन रचला बनाव

**विशाखापट्टणम :** आंध्र प्रदेशमधील वैझॅगमध्ये (विशाखापट्टणम) सुनेनं सासूची हत्या करण्याकरिता युट्यूबचा वापर केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ६६ वर्षाच्या वृद्धेच्या हत्या प्रकरणात पोलिसांनी सुनेला अटक केली आहे. जयंती कनका महालक्ष्मी असे मृत वृद्ध महिलेचं नाव आहे.

घरात आग लागून मृत्यू झाल्यानंतर ६६ वर्षीय महिलेचा पोलिसांनी तपास केला. पेट्रोल टाकून महिलेला सुनेनं जाळल्याचं तपासात समोर आलं आहे.

# सुलक्षणा पंडित आणि संजीव कुमार : प्रेम जे शब्दांत कधी आलंच नाही







बॉलीवूडच्या झगमगाटात असंख्य प्रेमकथा उमलल्या, काही फुलल्या, काही कोमेजल्या पण काही अशा होत्या ज्या कधी सुरुवात झाली की शेवट हेच कळलं नाही. अशीच एक कथा गाण्यांइतकी मधुर पण शेवटपर्यंत न उच्चारलेली म्हणजे सुलक्षणा पंडित आणि संजीव कुमार यांचं प्रेम. सुलक्षणा पंडित या अतिशय सुंदर आणि मधुर आवाज असलेल्या अभिनेत्री आणि गायिकेचं संजीव कुमारवर प्रेम होतं, तिने त्यांना प्रपोज देखील केलं होतं पण संजीव कुमारचा जीव हेमा मालिनीवर जडला असल्याने त्यांनी सुलक्षणा पंडित यांना नकार दिला. आयुष्यात कधी, केव्हा, कोण कोणाला का आवडेल किंवा का आवडणार नाही, हे सांगणं अतिशय कठीण आहे! प्रेमाची व्याख्या तशी कुणाला करता आलीच नाही!

सत्तरच्या दशकात सुलक्षणा पंडित हे नाव गायकीत झळकत होतं. घराणं संगीतमय पंडित परिवारात जन्मलेली सुलक्षणा ही स्वर आणि अभिनयाचा संगम आणि सुरांच्या दुनियेत वाढलेली. त्याच काळात संजीव कुमार म्हणजे अभिनयातील एक विद्यापीठच! ''कोशिश'', ''आंधी'', ''शोले'', आणि ''अनामिका'' सारख्या चित्रपटांनी त्यांना अभिजात उंची गाठून दिली होती. दोघांची भेट झाली एका चित्रपटाच्या निमित्ताने व्यावसायिक ओळखीतून हळूहळू एक भावनिक नातं आकार घेत गेलं. सुलक्षणाच्या मनात संजीवसाठी एक आदर, एक आकर्षण आणि एक प्रेम निर्माण झालं, जे तिनं कधीही लपवलं नाही. सुलक्षणा पंडित यांनी अनेक मुलाखतींमध्ये स्पष्ट सांगितलं ''मी संजीव कुमार यांना मनापासून प्रेम केलं.''

त्यांचं प्रेम एकतर्फं होतं, पण शुद्ध आणि निखळ होतं. संजीव कुमार मात्र त्यांच्या आयुष्यात हेमा मालिनीसाठीचं आपलं प्रेम घेऊन फिरत होते आणि ते प्रेमही अधुरं राहिलं. एकाच्या हृदयात दुसऱ्याचं नाव, आणि तिसऱ्याच्या मनात वेदनेचा प्रवाह. या त्रिकोणात सुलक्षणाचं आयुष्य हळूहळू विरघळत गेलं. सुलक्षणाच्या आवाजात अनेक गाणी होती, पण काही गाणी जणू तिच्या स्वतःच्या भावना गात होती, सुरांत जपलेलं प्रेम जसे ''तू इस तरह से मेरी जिंदगी में शामिल है'' हे गाणं जरी चित्रपटासाठी रेकॉर्ड झालं, तरी प्रत्येक ओळीमध्ये तिच्या अधुऱ्या प्रेमाची जाणीव होती.

संजीव कुमार मात्र त्यांच्या शांत, अंतर्मुख स्वभावामुळे कधीच काही बोलले नाहीत. पण त्यांच्या डोळ्यांत ती गहन वेदना आणि न बोलेले शब्द दिसायचे, जे फक्त सुलक्षणासारख्या संवेदनशील मनालाच जाणवले असतील. संजीव कुमार शेवटपर्यंत अविवाहित राहिले. त्यांच्या निधनानंतर सुलक्षणा पंडित कोलमडून गेल्या. त्यांनीही पुन्हा लग्न केलं नाही आणि अनेक वर्षं एकाकीपणात जगल्या. त्यांच्या मनात एकच सत्य कायम होतं. ''जे प्रेम कधी मिळालं नाही, तेच खरं होतं.'' त्यांची अधूरी कहाणी, पण अमर नातं. ही कथा ना पत्रांत लिहिली गेली, ना गाण्यांत पूर्ण झाली पण ती भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वांत हृदयस्पर्शी प्रेमकथा ठरली.

सुलक्षणा आणि संजीव कुमार यांनी जगाला शिकवलं. प्रेम म्हणजे मिळवणं नाही, तर शांतपणे आठवणीत जगणं होय. त्यांचं नातं काळाच्या पलीकडे गेलं, एकानं गाण्यांतून बोललं आणि दुसऱ्यानं नजरेतून. दोघांनीही जीवनभर मौन पाळलं, पण त्या मौनातही शब्दांपेक्षा गहिरं प्रेम होतंकदाचित सुलक्षणा कालपर्यंत त्या स्वरांत हरवत होती आणि संजीव कुमारच्या स्मितात ती अजूनही उत्तर शोधत होती. प्रेम कधी-कधी संपत नाही, ते फक्त एक सुरात रूपांतरित होतं

सुलक्षणा पंडित यांचं पारिवारिक जीवन कटकटींनी भरलेलं होतं. त्यांचे वडील, दोन्ही काका, (एक काका पंडित जसराज), बंधू प्रसिद्ध संगीतकार जतीन-ललित, मंधीर हा अजून एक भाऊ देखील संगीतकार, एक बहीण सुप्रसिद्ध अभिनेत्री विजयता, तिचा नवरा सुप्रसिद्ध संगीतकार आदेश श्रीवास्तव, चुलत बहीण सुप्रसिद्ध गायिका हेमलता... सारेच संगीत क्षेत्राशी संबंधित असले तरी त्यांचं प्रत्यक्ष जीवन मात्र संगीतमय होऊ शकलं नाही. वडिलांनी दुसरा विवाह केला आणि या परिवाराला गरिबीचे दिवस आले. त्यांनी गायन सुरु केलं. हळूहळू अभिनय क्षेत्रातही उतरल्या. दोन्ही क्षेत्रात त्यांनी नाव कमावलं. पण आईचं, मोठ्या भावाचं निधन, सिनेसृष्टीत अपेक्षित यश न मिळणं, अपघात (बाथरूममध्ये पाय घसरून पडणं) अशा अनेक घटनांनी त्यांच्यावर मानसिक आणि शारीरिक आघात केले. संजीव कुमारसाठी त्या कायम अविवाहित राहिल्या! त्यांच्या अपुऱ्या प्रेम कहाणीसाठी सरस्वती चंद्र चित्रपटातील गीतकार इंदीवर यांनी लिहिलेल्या आणि लता मंगेशकर यांनी गायलेल्या या ओळी आठवतात.

तन से तन का मिलन हो न पाया तो क्या
मन से मन का मिलन कोई कम तो नहीं
खुशबू आती रहे दूर से ही सही
सामने हो चमन कोई कम तो नहीं
चाँद मिलता नहीं सबको सँसार में
है दिया ही बहुत रोशनी के लिए

त्यांच्या जीवनातील संजीव कुमार नावाचा दिया गेला हा दिया गेला आणि त्या डीप डिप्रेशनमध्ये गेल्या!

दिल में ऐसा दर्द छुपा है, मुझसे सहा न जाए
कहना तो चहू अपनों से मई, फिर भी कहा न जाये
आँसू भी आँखों में आये, चुपके से पी जाऊ
जीवन के पिंजरे में, मनन का ये पंछी
कैसे कैद से छूटे
जीना होगा इस दुनिआ में, जब तक साँस न टूटे
दम घुट ता है अब सांसो का, कैसे बोझ उठाऊ
अपने जीवन के इस उलझन को कैसे मैं सुलझाऊ..

उलझन चित्रपटातील हे सुंदर गाणं त्यांचं जीवन झालं! आयुष्यातील उलझन त्या कधीही सोडवू शकल्या नाहीत! ज्या अभिनेत्यावर जीवापाड प्रेम केलं, त्याच्याच मृत्यूच्या दिवशी तिचं निधन व्हावं! किती विलक्षण योगायोग आहे! ६ नोव्हेंबर रोजी संजीव कुमार यांच्या मृत्यूनंतर जवळपास ४० वर्षांनी त्याच तारखेला त्यांचा मृत्यू झाला! प्रतिभासंपन्न अभिनेत्री सुलक्षणा पंडित यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



**प्रवीण बागडे**
नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# राहुल गांधींचा आरोप; हरियाणाप्रमाणेच महाराष्ट्र, मध्य प्रदेशातही मतचोरी, आमच्याकडचे पुरावे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** लोकसभेचे विरोधी पक्षनेते यांनी पुन्हा एकदा मतचोरीचा आरोप केला आहे. हरियाणामध्ये जशी मतचोरी झाली आहे तशीच मतचोरी मध्य प्रदेश, म हाराष्ट्र आणि छत्तीसगढ या ठिकाणीही झाली आहे असा आरोप राहुल गांधींनी केला आहे. मागील आठवड्यात पत्रकार परिषद घेऊन राहुल गांधींनी आरोपांच्या फैरी झाडल्या होत्या. त्यानंतर पुन्हा एकदा राहुल गांधी यांनी मतचोरीचा आरोप केला आहे.

काय म्हणाले राहुल गांधी?



मी स्पष्टपणे सांगू शकतो की हरियाणाप्रमाणेच महाराष्ट्र, छत्तीसगढ, मध्य प्रदेश या ठिकाणीही मतांची चोरी झाली आहे. आमच्याकडे सगळे पुरावे आहेत. हळूहळू आम्ही ते पुरावे समोर आणू. तसंच निवडणूक आयोगाकडेही आम्ही दाद मागणार आहोत. लोकशाहीवर आणि संविधानावर हल्ला केला जातो आहे. हा हल्ला नरेंद्र मोदी, अमित शाह आणि ज्ञानेश कुमार करत आहेत. त्यामुळे भारतमातेचं अतोनात नुकसान होतं आहे.

मागील वर्षी पार पडल्या निवडणुका

हरियाणा आणि महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका मागील वर्षी पार पडल्या. या निवडणुकांमध्ये भाजपाला घवघवीत यश मिळालं. म हाराष्ट्रात तर महायुतीला २३२ जागा मिळाल्या. या सगळ्यानंतर राज्यात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले आणि अजित पवार तसंच एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्री झाले. महायुतीला मि ळालेल्या या प्रचंड यशावरच राहुल गांधींनी आता प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. याआधी ऑगस्ट महिन्यांतही राहुल गांधींनी याच प्रकारे आरोप केले होते. आता हरियाणा या ठिकाणी २५ लाख मतांची चोरी झाली असं म्हणत राहुल गांधींनी जोरदार टीका केली होती. तसंच ब्राझीलच्या महिलेने १० बूथवरुन २२ वेळा मतदान केलं असाही खळबळजनक आरोप त्यांनी केला होता. तर भाजपाने आणि निवडणूक आयोगाने त्यांना उत्तर दिलं होतं. मात्र राहुल गांधींनी पुन्हा एकदा मतचोरीचा आरोप केला आहे. म हाराष्ट्र, छत्तीसगढ आणि मध्य प्रदेशात मतचोरी झाल्याचं राहुल गांधी म्हणाले आहेत.

महाराष्ट्रात नगरपंचायत, नगरपालिकेच्या निवडणुका होणार आहेत. तसंच महापालिका निवडणुकाही लवकरच होतील. त्या सगळ्या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांनी आता महाराष्ट्रातही मतचोरी झाली होती या आरोपाचा पुनरुच्चार केला आहे.

## महत्त्वाचे...

### स्नेह राणाने सांगितला वर्ल्डकप फायनलमधील हृदयस्पर्शी क्षण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आयसीसी महिला वनडे विश्वचषक २०२५ स्पर्धा भारतात पार पडली. या स्पर्धेत भारतीय संघाचा बोलबाला पाहायला मिळाला. भारतीय संघाने या स्पर्धेतील ३ म हत्वाचे सामने गमावले होते. त्यानंतर निर्णायक सामन्यात न्यूझीलंडला निर्णायक सामन्यात पराभूत करून भारतीय संघाने सेमीफायनलमध्ये प्रवेश केला. सेमीफायनलमध्ये ऑस्ट्रेलियाला आणि फायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेला पराभूत करून भारतीय संघाने जेतेपदाची ट्रॉफी उंचावली. दरम्यान फायनलमध्ये भारतीय संघाला सपोर्ट करण्यासाठी भारताचा माजी कर्णधार रोहित शर्माने देखील हजेरी लावली होती. या स्पर्धेतील फायनलचा सामना नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियममध्ये पार पडला. हा सामना पाहण्यासाठी भारताचे स्टार फलंदाज रोहित शर्मा, सचिन तेंडुलकर आणि व्ही. व्ही. एस लक्ष्मण देखील उपस्थित होते. दरम्यान रोहितला स्टँडमध्ये बसून सपोर्ट करताना पाहून भारतीय संघातील खेळाडू भावूक झाले होते. विश्वचषक स्पर्धा झाल्यानंतर खेळाडू आपल्या घरी परतले आहेत. आपल्या राज्यात परतल्यानंतर राज्य सरकारकडून आणि क्रिकेट चाहत्यांकडून खेळाडूंचं जल्लोषात स्वागत करण्यात आलं. दरम्यान भारतीय संघातील अष्टपैलू खेळाडू स्नेह राणाने एका मुलाखतीत रोहित शर्मा स्टेडियमममध्ये भारतीय संघाला सपोर्ट करण्यासाठी आला.

### निवडणुकीच्या तोंडावर बविआ व ठाकरे गटाचे कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

दैनिक आपला विदर्भ

वसई : महापालिका निवडणुकीचे बिगुल वाजले असल्याने वसई विरार शहरात मोठ्या प्रमाणात पक्षांतरणाचे वारे वाहू लागले आहेत. शनिवारी वालीव भागातील बहुजन विकास आघाडी व शिवसेना ( ठाकरे गट) कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी भाजप पक्षात प्रवेश केला.आगामी महापालिका निवडणुकीच्या तोंडावर शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. सर्वच पक्षांची मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकी भाजपाने यश मिळिवले होते. त्यामुळे भाजपाच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.आता महापालिकेत आगेकूच करण्यासाठी भाजपाने कंबर कसली आहे. विशेषत: भाजप कडून विरोधी पक्षाचे प्रमुख नेते, माजी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते यांना आपल्यात सामील करवून घेतले जात आहे.शनिवारी भाजपाच्या मुंबई प्रदेश कार्यालयात ही पक्ष प्रवेश सोहळा पार पडला.यात बहुजन विकास आघाडीच्या माजी नगरसेविका शकुंतला नागेश शेळके यांच्यासह गणेश धुमाळ,नागेश शेळके, रोहीत पाटील, जयेश धुमाळ, कल्पेश मोहीते, अंकुश शेळके, अनिल सिंह, राहुल सुमेरी, प्रकाश विटकर तर शिवसेना ( ठाकरे गट) भोयदापाडा शाखाप्रमुख शशिकांत अवघडे, आकाश मालेकर,उमेश नूलकर, दगडु वाघ, बबन वाघ, बाबु नायर, विनायक भोईर, बादल चौधरी, पप्पु शहाणी,किशोर मोहीते, कैलास मोहीते यांसह शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपप्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व वसईच्या आमदार स्नेहा दुबे- पंडित यांच्या हस्ते भाजपात प्रवेश केला.

## भारताच्या मुलीची ऐतिहासिक कामगिरी! तिरंदाजी स्पर्धेत भारतीय एबल-बॉडी ज्युनियर संघात निवड

**मुंबई/प्रतिनिधी :** देणाऱ्याने देताना काहीतरी विचार केलाच असेल, असं आपण नेहमीच म्हणतो. मग ते सुख असो किंवा दु:ख... आणि याचा अनुभव आपल्याला जगताना येतोच... अशीच गोष्ट आहे एका जिद्दी स्त्रीची... पायाच्या अंगठ्याने धनुष्य उचलला... तोंडातून बाण सोडला... आणि तिचा निशाणा अचूक लागताच भारताचा शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला. या १८ वर्षाच्या मुलीने दाखवून दिले की, प्रतिभेला शरीराची, परिस्थितीची किंवा मर्यादांची गरज नसून तुमच्यामध्ये धैर्य आणि जिद्ध असेल तर काहीही करु शकता येते.

ही गोष्ट आहे शीतल देवीची... जेद्दाह येथे होणाऱ्या आगामी आशिया कप स्टेज ३ साठी शीतल देवीची भारतीय एबल- बॉडी ज्युनियर संघात निवड झाली आहे. एबल-बॉडी ज्युनियर संघात समावेश होणारी ती पहिली भारतीय पॅरा तिरंदाज बनली आहे. विविध आव्हानांवर मात करत स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या खेळाडूंपैकी एक असणाऱ्या शीतलने जागतिक पॅरा तिरंदाजी स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. यानंतर आता तिची स्पर्धा सक्षम तिरंदाजांशी होणार आहे. हि भारतीय क्रिडा क्षेत्रातील ऐतिहासिक घटना आहे. तिच्या या यशाने तिच्यातील अपंगत्वाचे सगळे दोष पुसून टाकले आहेत. शितलने याबाबत सोशल मीडियावर पोस्ट टाकत आनंद व्यक्त केला आहे. या पोस्टम ध्ये शीतलने सांगितले आहे, जेव्हा मी स्पर्धा करायला सुरुवात केली, तेव्हा माझे एक छोटेसे स्वप्न होते - एक दिवस सक्षम लोकांसोबत स्पर्धा करण्याचे. सुरुवातीला मी यशस्वी झाले नाही, पण प्रत्येक अपयशातून शिकत राहिले. आज, ते स्वप्न एक पाऊल जवळ आले आहे. आशिया कप ट्रायल्सम ध्ये, मी तिसऱ्या क्रमांकावर पोहोचले आणि आता आशिया कपमध्ये सक्षम वर्गात भारताचे प्रतिनिधित्व करेन.

## सहस्र काव्यधारा संमेलनाचे १६ नोव्हेंबर रोजी सहस्रकुंड येथे आयोजन

**नांदेड/प्रतिनिधी :** मराठवाडा साहित्य परिषद शाखा नांदेडच्या वतीने येत्या १६ नोव्हेंबर रोजी सहस्रकुंड येथे सहस्र काव्यधारा या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

सुप्रसिद्ध कवी व्यंकटेश चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणाऱ्या या कवी संमेलनात नांदेड जिल्ह्यातील अनेक मान्यवर कवी सहभागी होणार आहेत. मराठी साहित्य चळवळ गतिमान करण्यासाठी मराठवाडा साहित्य परिषद शाखा नांदेड सातत्याने अनेक उपक्रम राबवत आहे. याच उपक्रमांतर्गत अनेक कवींना हक्काचे व्यासपीठ मिळावे. त्यांच्या कविता सादरीकरणाने मराठी काव्य क्षेत्राला नव्याने भरभराटी यावी यासाठीही मराठवाडा साहित्य परिषदेचे प्रयत्न सुरू आहेत. याच अनुषंगाने येत्या १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता सहस्रकुंड येथे सहस्र काव्यधारा संमेलन पार पडणार आहे.

## आद्य क्रांतीकारक राघोजी भांगरे यांचा इतिहास युवा पिढीने अंगीकारणे ही काळाची गरज : गुणवंत एच.मिसलवाड

दैनिक आपला विदर्भ


**नांदेड/प्रतिनिधी :** आपल्या या भारत देशाच्या इतिहासात अनेक ऐतिहासिक घडामोडी झाल्या. काहींची इतिहासात नोंद झाली तर काही क्रांती विरांची दखलच घेतली गेली नाही.१८५७ च्या उठावा अगोदर १८ व्या शतकात आदिवासी कोळी महादेव जमातीत जन्मलेले सुपूत्र आद्य क्रांतीकारक राघोजी भांगरे यांनी भारत देश स्वातंत्र्यासाठी इंग्रजांशी व जुलमी सावकारी विरोधात बंड पुकारून लढा दिला. अशा या महान आद्य क्रांतीकारकाचा इतिहास युवा पिढीने अंगीकारून समाजाप्रती-देशाप्रती कार्य करण्याची ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन एसटी म ेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. गुणवंत एच.मिसलवाड यांनी केले. ते दि.८ नोव्हेंबर २०२५ शनिवार रोजी बिरसा मुंडा चौक काबरा नगर नांदेड येथे सायंकाळी ठिक ५ वाजता सकल आदिवासी कोळी म हादेव व मन्नेरवारलू जमातीच्यावतीने संयुक्तीकरित्या सह्याद्रीचा ढाण्या वाघ, ब्रिटीशांचा ज्वलंत कर्दनकाळ, देश स्वातंत्र्य लढ्यातील आद्य क्रांतीकारक राघोजी रामजी भांगरे यांची २२० वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



या जयंती अभिवादन कार्यक्रम सोहळ्यात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. सर्व प्रथम समाजाचे ज्येष्ठनेते मा.श्री. उत्तम गुंडावार यांच्या हस्ते आद्य क्रांतीवीर राघोजी भांगरे यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना ते आपल्या भाषणात म्हणाले की, राघोजी भांगरे यांनी जंगल उठावासाठी, शेतकऱ्यांसाठी, सकल आदिवासी जमातीसाठी, देश स्वातंत्र्यासाठी अतुलनीय शौर्य गाजवून शहिद झाले. अशा या महान आद्य क्रांतीवीराचा इतिहास महाराष्ट्र शासनाने शालेय पाठ्यक्रमामध्ये समाविष्ठ करावा, जेणे करून युवा पिढींना आदर्श मिळेल, अशीही मागणी आपल्या भाषणात मा.श्री. गुणवंत एच.मिसलवाड यांनी राज्य शासनाकडे केली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.ज्ञानेश्वर मरकंटे यांनी केले तर सुत्रसंचालन दादाराव कोठेवाड यांनी केले. शेवटी आभार प्रदर्शन मुख्याध्यापक माधव रेडेवाड यांनी म ानले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून लेखाकार रावसाहेब पल्लेवाड, लक्ष्मण दोंतूलवाड,राजू पालेपवाड, विठ्ठलराव पंजेवाड, प्रा.ज्ञानेश्वर मरकंटे, दत्तात्रय अन्नमवाड, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच.मि सलवाड, भाऊराव चिंचलवाड, ज्ञानेश्वर हाराळे, मुख्याध्यापक माधव रेडेवाड,बापूराव पारवे, दादाराव कोठेवाड, शिवाजीराव ताटे, महिपती डोंबूलवाड, सुर्यकांत खानापूरकर, गणपतराव नागदरवाड, प्रभू इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमास नांदेड शहरातील तमाम सकल आदिवासी जमातीचे बंधू-भगीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शब्दकोडे क्र. 05



आडवे शब्द

१. बिघडलेल्या, बदललेल्या मनाचा ३. ज्या राजाच्या नावाने वर्षगणना चालतो तो राजा ५. जिल्ह्याचा न्यायाधीश ९. मुलाची-मुलीची मुलगी १०. माया, प्रेम, उमाळा ११. अपक्व १२. पराभव १३. गणपती १५. त्रास, तगादा १६. चांभाराची आर १७. मार्ग १८. आयुष्यभर १९. तात्पर्य, सारांश २०. समान, योग्य २२. हाकाटी २४. त्रास, खेप २५. पाणी २६. विलक्षण २८. एका वर्गात शिकणारे ३१. नीरस, बेचव ३३. घोडशाळा ३४.ओसाड, वस्तीहीन ३५. उजाड, उदास ३७. दात ३८. उंबरठा ४०. मंदीरातील मुख्य सेवेकरी ४२. अटीची भाषा ४३. भाववाढीचा व्यापारांचा मार्ग ४५. कुरघोडी ४६. आयात, आलेला ४८. किनारा ५०. प्रमाणे, सारखे ५१. समाजातील वजन ५२. ओरड, तक्रार, गाऱ्हाणे ५३. पुत्र ५५. लक्ष्मी, शोभा ५७. चिकित्सा ५८. रद्द केलेला ५९. समुद्र ६०. लक्ष्मी ६१. एक आदिवासी जमात ६३. नाही म्हणणे ६५. वर्तमानपत्र (हिंदी) ६७. एक अधिक पाव ६८. उष्ण ६९. हद्द, टप्पा ७०. कट ७२. गवंडी ७३. पूर्णिमा ७६. अक्षरापुढील उभा दंड ७७. दुसऱ्याचा पैसा कसाही खर्च करणारा या अर्थाची म्हण

उभे शब्द

१. उशीर न करता २. दुसऱ्याचे उपकार विसरणारा ३. मनाला टोचणारी गोष्ट, बाणाचे टोक ४. डाळीची वा धान्याची सत्त्वयुक्त आमटी ५. बरा ६. नाश्ता ७. मित्र, स्नेही ८. आण, भाक १०. बातमीदार ११. दया, करुणा १४. निराश १५. मागच्या काळात झालेला १६. अनुसरणारा, शिष्य १७. पुन्हा पुन्हा १९. प्रयत्न २१. धंदा, उद्योग २३. रसाने भरलेले २६. शेळी २७. चूर्ण २९. आरोळी, आरडाओरडा ३०. सतत चिंतन ३२. गुणज्ञ ३३. पराक्रमाने जिंकलेला प्रदेश ३४. रिकामी खटपट ३६. धोबी ३९. व्रत ४१. जावई ४४. बातमी देणारा ४६. येणारे ४७. वळकटी ४९. उपहास ५१. अर्धी ओंजळ ५२. पोपटासारखा बोलका पक्षी ५३. संयुक्त विचार ५४. चांदणी ५६. धनी ५८. रिहार, दूर करणे ६२. सुसर ६४. चंद्र ६५. असामान्यता, कौतूक ६६. अभिमान ६६अ. शिव ७०. एक प्रकाशमान कीडा ७१. स्थिर, निश्चल ७२. कबूल, अनुकूल ७३. झाडी, मोहरी ७४. मुस्लिम पंडित अथवा न्यायाधीश ७५. नखरे, हावभाव

### शब्दकोडे क्र. 04 चे उत्तर

आडवे उत्तर

२.खबरदारी ५.सवालजवाब ९.दुर्लक्षित १०.माह १२.दंड १४.रवा १६.कस्तुरीमृग १९.जादूगार २०.सनातनी २३.चकमक २४.टग्या २५.सागरतीर २९.जुने ३०.खीर ३१.तरु ३३.कृतज्ञ ३४.टवाळ ३६.अंगना ३९.मोकाट ४१.विटका ४२.सफरचंद ४५.सराईत ४८.अधिक ५०.बोट ५१.करुणा ५२.डाकू ५३.क्रोध ५४.बळकटी ५६.प्रथा ५८.अखिल ५९.दाटी ६०.संतापलेला ६२.दरा ६४.कलकत्ता ६६.खडूस ६८.आरव ६९.बट्टा ७१.जोक ७२.मलई ७५.कूपमंडूक ७७.कृश ७८.कर्नाटक ७९.रडराऊत

उभे उत्तर

१.दुर्लभ २.खतरनाक ३.रमा ४.दाहक ६.वादंग ७.लड ८.वावदूक ११.कैरी १३.धरणी १५.वात १७.स्तुती १८.मृदंग १९अ.पचका २०.समजूतदार २१.नीटनेटका २२.प्रीती २५.सार २६.रणांगण २७.रस्सा २८.अंत ३०.खीळ ३२.रुक्ष ३५.वाटसरु ३७.कंटक ३८.दासबोध ३९.मोद ४०.बाई ४१.विधिलिखित ४३.फट ४४.चंगळ ४६.राणा प्रताप ४७.तडा ४९.माधवराव पेशवे ५१.कटी ५४.बटीक ५५.कलंक ५७.थाप ६१.लेखक ६१अ.लाडू ६२.दर ६३.मुबलक ६५.लक्ष्य ६७.सम ६८.आई ७०.समंध ७१.जोकर ७३.लढाऊ ७४.भाट ७६.भात

# निवडणुकीपूर्वी सुनील शेळके अनब बाळा भेगडेंनी इनकमिंगचा सपाटा लावला

**पुणे/प्रतिनिधी** : राज्यात पुन्हा एकदा निवडणुकांचं बिगुल वाजलं आहे, नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकांचे बिगुल वाजताच पुण्यातील मावळ तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादांच्या पक्षाचे आमदार सुनील शेळके आणि भाजपचे माजी मंत्री बाळा भेगडेंमध्ये चढाओढ सुरु झाली आहे. भेगडेंनी लोणावळ्यात विविध पक्षातील कार्यकर्त्यांचे भाजपमध्ये प्रवेश करुन घेतले तर शेळकेंनी ओव्हळे गावच्या सरपंचांसह समर्थकांच्या हाती राष्ट्रवादीचं घड्याळ बांधलं. यानिमित्ताने महायुतीतील भाजप आणि राष्ट्रवादी एकमेकांसमोर उभी ठाकली आहे. तर दुसरीकडे चिपळूणमध्ये नगराध्यक्ष पदाचा उमेदवार निवडीवरून चिपळूणमध्ये युती आणि आघाडीमध्ये रस्सीखेच सुरू झाली आहे.

पान १ वरून...

## महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या

अध्यक्षपदासाठी प्रवीण दरेकर आणि रणजीत सावरकर यांच्यात थेट लढत झाली होती. अखेर प्रविण दरेकर यांनी यामध्ये बाजी मारली आहे. म हासचिव पदासाठी भरतकुमार व्हावळ आणि राकेश तिवारी यांच्यात निवडणूक झाली. कार्यकारी सचिव या पदासाठी शैलेश ठाकूर, सविता बावनथडे आणि प्रशासकीय सचिव पदासाठी महेश सकपाळ व नीलम पाटील यांच्यात लढत झाली. उपाध्यक्ष पदासाठी एकूण २३ उमेदवार रिंगणात आहेत. त्यात पंकज भारसाखळे, मुन्ना कुरणे, मिलिंद साळुंके, तुषार रंधे, अविनाश बागवे, संग्राम गावंडे, गौतम चाबुकस्वार, गौरव चांडक, राजेश देसाई, शेख गफ्फार अकबर, वैभव वनकर, संतोष आंबेकर, विक्रांत खेडकर, नील पाटील, शाहुराज बिराजदार, अरुण बुटे, जयप्रकाशप दुबळे, अमर भंडारवार, नीलम पाटील, गोपाल देवांग, राजाराम दळवी, विजय सोनावणे यांच्यात लढत झाली.

नवीन कार्यकारिणीवर राज्यातील बॉक्सिंग खेळाचा विकास, स्पर्धांचे नियोजन, खेळाडूंना प्रशिक्षण सुविधा, जिल्हा-अंतरराष्ट्रीय स्पर्धांतील सहभाग आणि धोरणात्म क नियोजनाची मोठी जबाबदारी असणार आहे. त्यामुळं या निवडणुकीकडे क्रीडा वर्तुळाचे लक्ष लागले होते.

## थोरल्याच्या प्रतापाने धाकट्यावर

समोर आलं आणि त्यामुळे जय पवारांची नगराध्यक्ष पदाची उमेदवारी हुकली अशा चर्चांना उधाण आलं आहे.

पार्थच्या पाठीशी पवार कुटुंब

पार्थ पवार प्रकरणी आजोबा शरद पवार वगळता संपूर्ण कुटुंब पार्थ पवारांच्या पाठीशी उभा राहिलेलं आपल्याला पाहायला मिळते. आत्या सुप्रिया सुळे यांनी तर थेट पार्थ काही चूक करणार नाही असं म्हणत त्याची पाठराखणच केली. तर भाऊ रोहित पवार यांनी भाजपला प्रश्न विचारले. तर वडील म्हणून अजित पवार देखील पार्थ पवार यांच्या पाठीमागे आहेत.

गेल्या महिन्यात उपमुख्यमंत्री अजित पवारांनी बारामतीतील एका जाहीर कार्यक्रमात पोरांना किती जरी कमावून ठेवलं तरी कमीच असतं असं वक्तव्य केलं होतं. उपमुख्यमंत्री अजित पवारांना हे प्रकरण आगामी काळात उघडकीस येणार याची कुणकुण लागली होती का असावा या निमित्ताने उपस्थित होते.जय पवार यांच्या उमेदवारीवरून अजित पवारांनी जरी त्याला पूर्णविराम दिला असला तरी आगामी काळात जर गटबाजीचे पेव फुटलं तर अचानक जय पवारांचे नाव पुन्हा रिंगणात येऊ शकतं अशी शक्यता नाकारता येत नाही.

दुसरा उमेदवार दिला तर गटबाजीचा धोका

जय पवार हे बारामती नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार असतील तर नगराध्यक्षाची निवडणूक अजित पवारांना सोपी जाईल. मात्र जय पवार यांच्या जागी जर दुसरा उमेदवार उभा केला त्याचा अंतर्गत गटबाजीचा फटका उमेदवाराला बसणार हे सांगण्यासाठी कुठल्याही ज्योतिषाची गरज नाही. जरी आता अजित पवारांनी या चर्चा नाकारल्या असल्या तरी फॉर्म भरण्याच्या शेवटच्या दिवशी काय होतं हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि

अशी माहितीही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली. तर मनसे संदर्भात कुठेही असा प्रस्ताव आलेला नाही. १२ तारखेच्या बैठकीतही याची धुसरही शक्यता नाही. प्रस्ताव आला तर राष्ट्रीय पातळीवर चर्चा होईल. इंडिया आघाडीही एकट्या राष्ट्रवादी आणि शिवसेनेवर अवलंबून नाही. इंडिया आघाडी ही कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंत विविध पक्ष यात सहभागी आहेत. सगळे मिळून या संदर्भात निर्णय घेतील. असेही ते म्हणाले.

मुंबई, पुणे नाही तर अगदी तालुका पातळीवर जम ीन घोटाळ्याचा रॅकेट सक्रिय आहे. राज्यातील दलाल हे सरकार चालवत आहेत. पुणे जमीन घोटाळा प्रकरणी अजित पवारांनी तातडीने राजीनामा दिला पाहिजे. मात्र हे बेशरम सरकार आहे. झोटिंग कमिटीचं नाही ऐकलं जात आणि दुसरीकडे क्लीन चिट दिले जाते. अजित पवारांकडे देवेंद्र फडणवीस यांचे मोठे मोठे घपले आहेआणि त्यांनी लाटलेल्या जमिनीचा किस्सा त्यांच्याकडे आहे. असा आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी केलाय.

पार्थ पवारांना वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. ज्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे त्यांना विजय म ाल्या पॅटर्न प्रमाणे देशातून या सरकारने पळवून लावलेलं आहे. त्यामुळे हे सर्व प्रकरण ईडीकडे जायला पाहिजे, आणि सर्वोच्च न्यायालयाने ही दखल घेतली पाहिजे. अशी मागणी हर्षवर्धन सपकाळ यांनी केलीय.

# महाराष्ट्र हे भारताचे खरे 'स्टार्टअप कॅपिटल'

## नाविन्यपूर्ण कल्पना असणाऱ्या प्रत्येकाला नवउद्योजक बनण्याची संधी – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : भारतातील सर्वाधिक नोंदणीकृत स्टार्टअप्स महाराष्ट्रात असून यातील ४५ टक्के स्टार्टअप्स महिलांच्या नेतृत्वाखाली आहेत, ही अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्र हे देशाचे खरे 'स्टार्टअप कॅपिटल' असल्याचे सांगून भारताच्या पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनण्याच्या उद्दिष्टात महाराष्ट्राचा आणि त्यातही महिला उद्योजकांचा मोठा वाटा असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर तरुणांच्या मनातील प्रत्येक कल्पना ही नाविन्यता असून स्टार्टअप्सच्या या काळात प्रत्येक व्यक्तीला नवउद्योजक बनण्याची संधी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या 'इनोव्हेशन महाकुंभ २०२५' चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जुहू येथील विद्यापीठ परिसरात झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. महिला शिक्षणाचे महत्त्व जाणून महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ सुरू करणाऱ्या भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यापीठामार्फत केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सहकाऱ्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे संयुक्त सचिव आर्मस्ट्राँग पामे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.डॉ.उज्वला चक्रदेव, 'नॅक'चे अध्यक्ष प्रा.अनिल सहस्त्रबुद्धे आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, ब्रिटनमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता, त्या काळात भारतरत्न महर्षी कर्वे यांनी १९१६ मध्ये महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन केले. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच आज आपण महिला सक्षमीकरण आणि नवकल्पनांच्या नव्या युगात प्रवेश केला आहे. राज्य शासनाने



नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी धोरण तयार केले आहे. तरुणांच्या स्वप्नांना पंख देण्याची सरकार आणि विद्यापीठांची भूमिका असून राज्य शासन प्रत्येक टप्प्यावर नवउद्योजकांना साहाय्य करीत आहे.

मुख्यमंत्री म्हणाले, आज नवकल्पनेतून केवळ नवे उत्पादन नव्हे, तर जीवन अधिक सुलभ केले जात आहे. एखादी कल्पना जेव्हा बाजारपेठेत रूपांतरित होते, तेव्हा ती अर्थव्यवस्थेला गती देते. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा ॲनालिटिक्समुळे आता नव्या कल्पनांना वेग मिळत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या 'स्टार्टअप इंडिया' उपक्रमामुळे आज भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची स्टार्टअप इकॉनॉमी बनला असून लवकरच दुसऱ्या क्रमांकावर पोहोचेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात महिला उद्योजकांनी विकसित केलेल्या नवकल्पनांचे प्रदर्शन मांडण्यात आले आहे. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी प्रदर्शनाची पाहणी करून सर्व नवोन्मेषकांचे अभिनंदन केले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते यावेळी वैद्यकीय, कृषी आणि वाहतूक व्यवस्थापन क्षेत्रातील उत्कृष्ट तीन स्टार्टअप कल्पनांचा सत्कार करण्यात आला. तसेच प्री इन्क्युबेशन सेंटरचे उद्घाटन करण्यात आले.

कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी राज्यात शिक्षण आणि नाविन्यता क्षेत्रात वेगाने काम होत असल्याचे सांगून येणाऱ्या काळात महाराष्ट्र या क्षेत्रात प्रथम क्रमांकावर असेल, असा विश्वास व्यक्त केला. शिक्षण आणि नाविन्यता क्षेत्रात महिलांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचा उल्लेख करून शासन एसएनडीटी विद्यापीठाच्या पाठीशी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.


विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.डॉ. उज्वला चक्रदेव यांनी प्रास्ताविकाद्वारे 'इनोव्हेशन महाकुंभ २०२५' बाबत माहिती दिली.

# अभिनेता वरुण धवनने आपल्या सोशल मीडियावर शेअर केला हुक्कीचा फर्स्ट लुक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : मराठी चित्रपटसृष्टीत हॉरर-कॉमेडी चित्रपट प्रेक्षक खूप पसंत करतात. आता चार मित्रांची गोष्ट सांगणारा हुक्की हा आगामी मराठी चित्रपटही लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हुक्कीच्या पहिल्या पोस्टरनंतर या चित्रपटाचा फर्स्ट लुक नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. दमदार कलाकारांची फौज या चित्रपटामध्ये दिसणार आहे. एक वेगळ्या विषयावर आधारित चित्रपट असल्यानं हुक्कीच्या फर्स्ट लुकनं रसिकांचे लक्ष वेधले आहे. सोशल मीडियावर हुक्कीच्या फर्स्ट लुकची जोरदार चर्चा रंगू लागली आहे. हिंदी सिनेसृष्टीतील आघाडीचा अभिनेता वरुण धवननं हुक्कीचा फर्स्ट लुक आपल्या सोशल मीडियावर शेअर केला आहे.

हुक्की चित्रपटाचं फर्स्ट लुक उत्साह वाढविणारे : निर्माते नितीन रोकडे, सुनंदा काळुसकर, श्वेता संजय ठाकरे, विनायक पाष्टे तसेच सहनिर्माते सुधीर खोत आणि रईस खान यांनी मॅजिक स्वान स्टुडिओज आणि एनएमआर मुव्हीज या बॅनरखाली हुक्की चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. कथालेखनासोबतच या चित्रपटाचं दिग्दर्शन नितीन रोकडे यांनी केलंय. हुक्कीचा फर्स्ट लुक खऱ्या अर्थानं रसिकांचा उत्साह वाढविणारा आहे.




कावळ्याचा लालभडक डोळा उघडतो आणि फर्स्ट लुकची सुरुवात होते. त्यानंतर समुद्रकिनारी कोळी बांधव होडी ओढत असल्याचं दृश्य पाहायला मिळते. या दृश्यामागोमाग तीन तरुण आणि एक तरुणी यांची चौकडी चालत येत असल्याचं दिसते. त्यांना फोर लूझर्स असे संबोधले गेले आहे. त्यानंतर एक भयावह रात्र सुरू होते. या रात्री चौघेही विचित्र परिस्थितीत अडकतात. फर्स्ट लुक पाहिल्यावर हुक्की या हॉरर कॉमेडीपटात प्रवाहापेक्षा वेगळे कथानक पाहायला मिळणार असल्याची जाणीव होते.

हुक्की चित्रपटातील मुख्य स्टार : महाराष्ट्राचा लाडका अभिनेता प्रथमेश परब आणि विनोदाचा बादशाह पंढरीनाथ कांबळे उर्फ पॅडी या चित्रपटात दिसणार आहेत. दरम्यान या चित्रपटाच्या फर्स्ट लुकबाबत नितीन रोकडे यांनी सांगितलं, ''हुक्कीच्या कथानकाचा बाज लक्षात घेऊन फर्स्ट लुक तयार करण्यात आला आहे. हा फर्स्ट लुक अत्यंत कमी वेळात आपले काम चोख बजावणारा आहे. हॉरर-कॉमेडीपटासाठी पोषक ठरणारी वातावरणनिर्मिती, कलाकारांचा लूक, पार्श्वसंगीत, सबटायटल्स यांचा सुरेख वापर हुक्कीच्या फर्स्ट लुकमध्ये आहे. त्यामुळं प्रेक्षकांना सिनेमागृहांपर्यंत आणण्यात फर्स्ट लुक महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.''

हुक्की चित्रपटाबद्दल : दिग्दर्शक नितीन रोकडे यांनी संदीप कुमार रॉय आणि मधुलीता दास यांच्याबरोबर हुक्कीची पटकथाही लिहिली आहे. या चित्रपटात प्रथमेश-पॅडीबरोबर रावी किशोर, प्रशांत मोहिते, महेश पाटील, मोहक कंसारा, आरती चौबल, वर्षा धांदले, आणि पंकज विष्णू आदी कलाकार आहेत. संगीतकार राघवेंद्र व्ही आणि प्रफुल-स्वप्नील यांनी या चित्रपटातील गीतरचना संगीतबद्ध केल्या असून साऊथमधील सुप्रसिद्ध संगीतकार, राघवेंद्र व्ही हुक्कीद्वारे मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करीत आहेत. डिओपी फारुख खान यांनी सिनेमॅटोग्राफी केली असून, नृत्य दिग्दर्शन संतोष गणपत पालवणकर आणि इमरान मालगुणकर यांनी केले आहे. या चित्रपटातील थरारक साहस दृश्ये संष कुमार आणि नितीन रोकडे यांनी डिझाईन केली आहेत.

# शेवटही पराभवानेच, टीम इंडियाची पुन्हा नामुष्की! पाकिस्तान सोडून सगळ्यांकडून हरले; लिंबूटिंबू संघांनी दाखवली दिनेश कार्तिकला जागा

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी** :हाँगकाँग सिक्सेस क्रिकेट स्पर्धेत भारताचा प्रवास निराशाजनक ठरला. दिनेश कार्तिकच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने पाकिस्तानविरुद्ध विजयाने स्पर्धेला शानदार सुरुवात केली होती. मात्र त्यानंतर संघाची काम गिरी घसरत गेली आणि सलग चार सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला. भारतीय संघाला श्रीलंका, कुवेत, यूएई आणि नेपाळकडून अनपेक्षित हार पत्करावी लागली. सलग पराभवानंतर टीम इंडियाचे सेमीफायनलचे स्वप्न भंगले. भारतीय गोलंदाजांनी सातत्य राखण्यात अपयश आले, तर फलंदाजांनीही निराशाजनक प्रदर्शन केले. भारत आणि श्रीलंका यांच्यात हाँगकाँग सिक्सेस स्पर्धेत रंगलेल्या शेवटच्या सामन्यात टीम इंडियासाठी अत्यंत निराशाजनक ठरला. ६-६ षटकांच्या सामन्यात भारतीय संघाचा नशिब साथ देऊ शकला नाही. प्रथम गोलंदाजी करताना भारतीय खेळाडूंनी निराशा केली आणि जेव्हा लक्ष्याचा पाठलाग करण्याची वेळ आली, तेव्हा श्रीलंकेच्या गोलंदाजांसमोर भारतीय फलंदाज अक्षरश: कोसळले. हाँगकाँग सिक्सेस स्पर्धेत भारताने केवळ पाकिस्तानविरुद्धच विजय मिळवला, तर उर्वरित सर्व संघांनी भारताला पराभवाची चव चाखवली. श्रीलंकेने या सामन्यात तब्बल ४८ धावांनी विजय मिळवला. हा सामना मोंग कोक येथील मिशन ग्राउंडवर खेळवण्यात आला. श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करत फक्त ६ षटकांत १३८ धावा फटकावल्या. लाहिरू समरकून आणि लाहिरू मधुशंका यांनी अर्धशतके झळकावली. दिनेश कार्तिकच्या अनुपस्थितीत स्टुअर्ट बिन्नीने भारतीय संघाचे नेतृत्व केले, मात्र कोणत्याही भारतीय गोलंदाजाची इकॉनॉमी २० धावांखाली राहिली नाही.

# पुणे जिल्ह्यात बिबट्या-मानव संघर्ष शिगेला: प्रशासनही अपयशी

## अखेर हल्ल्यापासून संरक्षणासाठी महिलांनी बांधले गळ्यात खिळ्यांचे पट्टे!

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : पुणे जिल्हा, विशेषतः शिरूर तालुक्यातील पिंपरखेड गाव, बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे सध्या दहशतीच्या सावटाखाली आहे. बिबट्यांच्या हॉटस्पॉटमुळे ग्रामस्थ भयभीत झाले असून, शेती हेच उपजीविकेचे मुख्य साधन असल्याने शेतात जाणे त्यांना अनिवार्य आहे. मात्र, बिबट्याच्या संभाव्य हल्ल्यातून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी ग्रामस्थ आता अनोख्या आणि प्रभावी उपाययोजना करत आहेत. बिबट्या सहसा मानेवर हल्ला करून शिकार करत असल्याने, महिलांनी आणि शेतकऱ्यांनी आपल्या जिवाचे रक्षण करण्यासाठी एक विचित्र पण गरजेचा मार्ग निवडला आहे.

या संकटकाळात पिंपरखेड येथील महिलांनी थेट टोकदार खिळे असलेला पट्टा आपल्या गळ्यामध्ये घातला आहे. जसे पाळीव कुत्र्यांना बिबट्यांपासून वाचवण्यासाठी गळ्यात खिळ्यांचे पट्टे घातले जातात, त्याच धर्तीवर शेतकऱ्यांनी आणि महिलांनी हा उपाय अवलंबला आहे. शेतात





काम करताना बिबट्याने अचानक हल्ला केल्यास, मानेवर असलेल्या या खिळ्यांच्या पट्ट्यामुळे बिबट्याला गंभीर दुखापत होईल आणि त्याची पकड ढिली होऊन जीव वाचू शकेल, अशी त्यांची धारणा आहे. बिबट्याच्या हल्ल्यातून जीव वाचवण्याचा हा अगतिक आणि धाडसी निर्णय पुणे जिल्ह्यातील वाढत्या वन्यजीव-मानव संघर्षाची तीव्रता दर्शवतो.

बिबट्याच्या हल्ल्यांमुळे होणारे वाढते मृत्यू पाहता, राज्य सरकार आणि वनविभाग ग्रामस्थांना सुरक्षा पुरवण्यात अपयशी ठरत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. बिबट्याच्या दहशतीतून जीव वाचवण्यासाठी आणि शेतीचे काम सुरू ठेवण्यासाठी, हतबल झालेल्या शेतकऱ्यांवर आता पाळीव कुत्र्यांप्रमाणे टोकदार खिळ्यांचे पट्टे गळ्यात घालण्याची वेळ आली आहे. ही परिस्थिती अत्यंत गंभीर आणि लाजिरवाणी असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांना स्वतः च्या संरक्षणासाठी असे धोकादायक आणि जुजबी उपाय करावे लागणे, हे लोकशाहीतील मूलभूत संरक्षणाच्या अपयशाचे प्रतीक आहे.

**बिबट्याचा हल्ला हा राज्य आपत्ती घोषित करावा– अमोल कोल्हे**

यावर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी प्रतिक्रिया दिली आहे, ते म्हणाले, कबूतरांच्या बाबत मुख्यमंत्र्यांनी तात्काळ बैठक घेतली होती. पण इकडे बिबट्याने ५७ बळी घेतल्यानंतर सरकारला जाग आली. आम्हाला त्यासाठी रास्तारोको करावे लागले. आमची मागणी आहे की बिबट्याचा हल्ला हा राज्य आपत्ती घोषित करावा. तसे जर केरळ सरकार घोषित करत असेल मग आपल्या मुख्यमंत्र्यांना काय अडचण आहे? असा सवाल कोल्हे यांनी उपस्थित केला आहे.

शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथे ग्रामस्थांच्या त्रासाला कारणीभूत ठरलेल्या नरभक्षक बिबट्याला ठार मारण्यात अखेर वन विभागाला यश आले आहे. रात्री उशिरा गावामध्ये बिबट्याचा शोध घेत असताना, वन विभागाच्या पथकाला हा बिबट्या ड्रोनमध्ये दिसला. बिबट्याला पकडण्यासाठी प्रथम त्याला डार्ट मारण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र तो निशाणा चुकला. या अयशस्वी प्रयत्नामुळे बिबट्या अधिक सावध झाला आणि त्याने थेट वन विभागाच्या कर्मचाऱ्यांवर प्रतिहल्ला करण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे परिस्थिती गंभीर बनली.

कर्मचाऱ्यांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी, शेवटी दोन शार्प शूटरने या बिबट्यावर तीन राऊंड गोळीबार केला, ज्यात तो बिबट्या जागीच ठार झाला. हा बिबट्या अंदाजे ६ वर्षे वयाचा नर जातीचा होता आणि त्याच्या नमुन्यांवरून व ठशांवरून हाच बिबट्या १३ वर्षीय रोहनचा जीव घेणारा नरभक्षक असल्याचे स्पष्ट झाले आहे. रोहनचा जीव घेतला होता त्या ठिकाणापासून केवळ ४०० मीटर अंतरावर या बिबट्याला ठार करण्यात आले. वन विभागाच्या या कारवाईमुळे पिंपरखेड परिसरातील दहशत काही प्रमाणात कमी होण्यास मदत झाली आहे.